आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जाहिरात क्र. १/२१९ दिनांक:- ३०/१०/२०२६.
जाहिरात प्रकटन

आरोग्य कार्यालयाअंतर्गत खालील अस्थायी पदावर ४४ दिवसा करिता करार पध्दतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

क्र.	हुद्दा	एकुण पदांची संख्या	शैक्षणिक अर्हता व अनुभव	एकवट मासीक मानधन रुपये	प्रवर्ग	कामाचे ठिकाण व कामकाज करण्याची वेळ
१.	मुलाणी (सफाईसेवक)	०७	इ.४ थी, उत्तीर्ण मुलाणी कामाचा ०१ वर्षाचा अनुभव :- (जनावरे कटाई करण्याचा अनुभव आवश्यक)	र.रु.२३,७८२/-	सर्व साधारण खुला	कोंढवा कत्तलखाना सकाळी (पहाटे) ५.३० ते दुपारी १.३०
२.	कनिष्ट अभियंता	०१	मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी /पदविका अगर तत्सम पदवी/पदविका अनुभव :- शासकीय अभियांत्रिकी कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक	र.रु.३५,०००/-	सर्व साधारण खुला	
३.	पशुवैद्यकीय अधिकारी	०१	मान्यताप्राप्त विद्यापीठाची पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी अथवा पदव्युत्तर पदवी अनुभव :- पशुवैद्यकीय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी आणि अथवा सबंधित कामाचा ०३ वर्षाच्या अनुभवास प्राधान्य	र.रु.६५,०००/-	सर्व साधारण खुला	

अटी :- अटी : १. वयोमर्यादा उमेदवारचे वय २२ ते ४५ दरम्यान असावे २.वरील शैक्षणीक पात्रता व अनुभव यांच्या गुणांकनानुसार निवड करण्यात येणार आहे. ३.पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसही हजर राहणे आवश्यक आहे. ४. सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरुपाचे आहे. ५. अर्ज घेऊन येताना उमेदवारांनी सोबत एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्राच्या छायांकीत सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. ६. निवड झालेल्या उमेदवाराना विहतिनमुन्यात करारनामा करुन फक्त ४४ दिवसाकरीता नेमणूक दिली जाईल. ७. अर्ज घेऊन येणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. ८. वरील पद हे अस्थायी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायमस्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. ९. वरील पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहतील. १०. अपात्र उरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. ११. पात्र उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. खातेप्रमुख यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १२. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. वरीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक 12/11/२०२६ रोजी सकाळी 2.00 वाजे पर्यंत आरोग्य कार्यालय, पशु वैद्यकीय विभाग, तिसरा मजला पुणे महानगरपालिका मुख्य इमारत, शिवाजीनगर पुणे ०५ येथे अर्ज भरण्यासाठी उपस्थित रहावे. उमेदवाराने सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयामार्फत वरील ठिकाणीच देण्यात येईल .

(डॉ.निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका